## रे. दि.मु. नं. २८३/२०१३ मधील नि. ८४ खालील आदेश

***CNR : MHSN06001354-2013)***

**(रावसाहेब बाबूराव तारदाळे वि. तात्यासाहेब बाबूराव तारदाळे व इतर)**

वादीने सदरचा अर्ज मुळ प्रतिवादी क्र. ८ च्या नावात दुरुस्ती करणेबाबत आदेश होणेसाठी दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ खाली दाखल केलेला आहे. वादीचे हुशार विधीज्ञ पुढे कथन करतात की, मुळ प्रतिवादी नं. ८ महावीर देवाप्पा संगमे हे मयत झाले आहेत. त्यांचे वारस याकामी रेकॉर्डवर घेतलेले आहेत. त्यामध्ये प्रतिवादी क्र. ८/३ मोहन देवाप्पा संगमे असे नाव वादीने दिलेल्या माहितीनुसार नमुद केले आहे. परंतु प्रतिवादी क्र. ८/३ यांचे नाव "मोहन" ऐवजी "रोहन" आहे असे नमुद केले आहे. म्हणून वादी यांनी प्रतिवादी नं. ८/३ याचे दावेतील "मोहन" ऐवजी "रोहन" अशी दुरुस्ती करणेस परवानगी मिळावी ही विनंती केली.

(२) सदर अर्जावर प्रतिवादी नं. ८/१ ते ८/३ यांनी म्हणणे नि. क्र. ८५ अ वर दाखल करुन आक्षेप नोंदवला. ते कथन करतात की, नावात दुरुस्तीबाबतचा अर्ज म्हणजे अक्षम्य निष्काळजीपणा आहे. सदर प्रतिवादी नं. ८/३ यांचे मोहन हे नाव नसुन रोहन असल्याची बाब याकामी पुरसीस दाखल करुन निदर्शनास आणून दिलेली आहे. त्यानंतर वादीने निष्काळजीपणामुळे दिरंगाई केली आहे. सबब सदरचा अर्ज नामंजुर करावा विकल्पेकरुन वादींचा अर्ज मंजुर केल्यास त्यांच्यावर मोठी खर्चाची रक्कम बसवण्यात यावी ही विनंती.

(३) दोन्ही हुशार विधीज्ञांचा युक्तिवाद ऐकला. अभिलेखाची पडताळणी केली. त्यावरुन असे दिसून येत आहे की, मुळ प्रतिवादी नं. ८ महावीर देवाप्पा संगमे हे मयत झाले आहेत. त्यांचे वारस याकामी रेकॉर्डवर घेतलेले आहेत. त्यामध्ये प्रतिवादी क्र. ८/३ मोहन देवाप्पा संगमे असे नाव नमुद केले आहे. प्रतिवादी क्र. ८/३ याचे नाव "मोहन" ऐवजी "रोहन" आहे असे नमुद केले

आहे. म्हणून वादी यांनी प्रतिवादी नं. ८/३ याचे दावेतील "मोहन" ऐवजी "रोहन" अशी दुरुस्ती करणेस परवानगी मागितली आहे. सदरचा दावा हा गुणांवर निकाली काढण्याकरीता दुरुस्ती करण्याचा अर्ज मंजुर होण्यास पात्र आहे. सदर दुरुस्तीमुळे दाव्याच्या मुळ स्वरुपात कोणताही बदल होणार नाही. सबब मी खालील आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

०१ निशाणी क्रमांक ८४ वरील अर्ज मंजूर.

०२. वादी यांचा दुरुस्तीचा अर्ज मंजूर केला आहे. सदरची दुरुस्ती आदेश झाल्यापासून १४ दिवसाच्या आत करुन घ्यावी.

सही/-

मिरज.    ( एम. एस. मनगुळी )

दिनांकः-२५.११.२०२१    दुसरे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, मिरज.

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. file Order are same, word to word, as per the original Order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | Smt. S.P.Patil. |
| Name of the Court | : | Shri. M. S. Managuli,<br>2nd Jt. Civil Judge J.D. & J.M.F.C., Miraj. |
| Date of Decision | : | 25/11/2021 |
| Order signed by the presiding officer on | : | 26/11/2021 |
| **Order uploaded on** | **:** | **26/11/2021.** |